just mumbai
पुण्य नगरी
बुधवार, २६ सप्टेंबर २०१२

चाकूने वार करणाऱ्याला अटक

भिवंडी : पत्नीवर एकतर्फी प्रेम असणाऱ्या एकावर चाकूने प्राणघातक हल्ला करून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या एकाला पोलिसांनी अटक केली. पिंटू ऊर्फ शब्बीर अन्सारी (२५) असे अटक आरोपीचे नाव असून त्याच भागात राहणाऱ्या शेख (२५) याचे अन्सारीच्या पत्नीवर एकतर्फी प्रेम होते. या प्रकरणी अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वायाळ करत आहेत.

वाहतूक नियंत्रकाला मारहाण

भिवंडी : कल्याण एसटी बसडेपोतील वाहकाने वाहतूक नियंत्रकाला मारहाण केल्याची घटना उघडकीस आली. प्रभाकर काकडे असे कल्याण डेपोतील आरोपी वाहकाचे नाव असून त्याची बस कल्याणहून भिवंडी डेपोत आली असता सुरक्षा आणि दक्षता खात्यातील वाहतूक नियंत्रक अशोक गरुड (५४) याने बस तपासून एका प्रवाशाकडे तिकीट नसल्याने त्याला ११० रुपयांचा दंड केला. तसेच तिकीट वाहक प्रभाकर काकडे याला एका अर्जावर सही आणि याबाबत जबाब देण्यास सांगितले. या गोष्टीचा राग येऊन प्रभाकरने गरुड यांना मारहाण केली.

कागदपत्रे छाननीसाठी म्हाडा आणि कामगार विभागाचे अधिकारी सज्ज

मुंबई : मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या जागेवर उभारण्यात आलेल्या आणि जून महिन्यात म्हाडाकडून जाहीर करण्यात आलेल्या ६९२५ गिरणी कामगारांच्या घराच्या कागदपत्रे छाननीची प्रक्रिया १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. त्यासाठी म्हाडा आणि कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्याधिकारी एन. सुधांशू यांनी दिली.

गिरणी कामगारांच्या ६९२५ घरांची सोडत म्हाडाकडून जून महिन्यात जाहीर करण्यात आली होती. त्यांनतर बँकेच्या निवड प्रक्रियेत महिन्याचा कालावधी गेल्यानंतर म्हाडाकडून मुंबै बँकेची निवड करण्यात आली. सध्या म्हाडाकडून मुंबै बँकेच्या माध्यमातून यशस्वी अर्जदारांना सूचना पत्र पाठवण्याचे काम सुरू असून आतापर्यंत ३००० यशस्वी अर्जदारांना पत्र पाठवण्यात आली आहेत. सोमवारी मुंबई मंडळाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत म्हाडाचे १५ अधिकारी आणि कामगार विभागाचे १५ अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

गिरणी कामगार घरे वाटप प्रक्रिया

या वेळेस मुंबई मंडळाचे मुख्याधिकारी आणि उपमुख्याधिकारी, अभियंते यांच्या उपस्थितीत हे प्रशिक्षण देण्यात आले.

कागदपत्रे छाननीसाठी कामगार विभागाकडून ठरवण्यात आलेल्या या पात्रता निकषांमध्ये गिरणी कामगाराला घरांसाठी कामाचा पास, ई.एस.आय. कार्ड, प्रॉव्हिडेंट फंड स्लिप नंबरसह, नोकरीचे प्रमाणपत्र किंवा लाल पास, भरपगारी रजेचे कार्ड, नैमित्तीक रजा कार्ड या कागदपत्रांचा समावेश करण्यात आला आहे. यापैकी कोणतेही एक कागदपत्र सादर केल्यास कामगारांची पात्रता सिद्ध करणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर ई.एस.आय. कार्ड व प्रॉव्हिडेंट फंड नंबर अर्जदाराने भरल्यास म्हाडाने त्यांची संगणकीकृत यादी तयार करून राज्य विमा योजना अथवा भविष्य निर्वाह निधी खात्यास पाठवून पडताळणी करण्यात येणार आहे. त्यामुळे म्हाडा श्रेणी १ व २ चे अधिकारी व कामगार विभागाचे अधिकारी अशा १५ टीम तयार करण्यात आल्या असून ३ अपिलीय अधिकारी नेमण्यात आले असल्याची माहिती पणन विभागाचे अधिकारी विलास महाजन यांनी दिली आहे.

वांद्रे येथील रेस्टॉरण्टमध्ये हुक्का पार्लर; ११ जण अटकेत

मुंबई : वांद्रे लिकिंग रोडवर असलेल्या रेस्टॉरण्टमध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर समाजसेवा शाखेच्या पोलिसांनी छापा टाकून ७ हुक्का पिणाऱ्यांसह ११ जणांना अटक केली आहे. या छाप्यात ४ लाखांहून अधिक रोख रकमेसह जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. बांद्रा (प.), लिकिंग रोड, शॉपर्स स्टॉप समोर असलेल्या शालीमार रेस्टॉरण्ट ॲण्ड फास्ट फूड या ठिकाणी हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती समाजसेवा शाखेच्या पोलिसांना मिळाली. या माहितीनुसार, सोमवारी मध्यरात्री १.२० वाजता पोलीस पथकाने या रेस्टॉरण्टवर छापा टाकून हुक्का ओढणाऱ्या ७ ग्राहकांसह रेस्टारण्टचा मॅनेजर मोहम्मद फैजल शाहीद खान (३०) ३ वेटर अशा ११ जणांना अटक केली. या ठिकाणाहून हुक्का ओढण्याच्या साहित्यासह स्टीलची बेडी, पॉइण्ट १२ बोअर गनचे एक जीवंत काडतूस आणि ४ लाख ४१ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत.

महाराष्ट्रातील बँकांवर सर्वाधिक दरोडे ; ८७६ घटनांत गमावले १९ कोटी

मुंबई : सन २००७ पासून राज्यातील बँकांनी दरोड्याच्या घटनांतून मोठ्या प्रमाणावर पैसे गमावल्याची माहिती पुढे आली आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील बँकांवर दरोड्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो'च्या (एनसीआरबी) अहवालातून उघड झाले आहे. या बँक दरोड्यांमुळे २००७ ते २०११ या अवधीत तब्बल १८ कोटी ९७ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले. शहरांचा विचार करता आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील दरोड्यांचे प्रमाण अधिक आहे.

गेल्या चार वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातील बँकांत चोरी आणि लुटीच्या तब्बल ८७६ घटनांची नोंद झाली. 'एनसीआरबी'च्या अहवालानुसार दरोड्यांतून झालेल्या एकूण आर्थिक नुकसानीपैकी जवळपास ७५ टक्के (११.४७ कोटी) नुकसान २०११ या एका वर्षात झाले. चोरीच्या घटनांत महाराष्ट्रापाठोपाठ केरळचा क्रमांक लागतो. तेथे १०० घटनांत १६ कोटी ८८ लाख रुपयांच्या रकमेची चोरी झाली. तिसऱ्या क्रमांकावरील कर्नाटक राज्यात ६८१ घटनांत १२ कोटी ४६ लाख रुपयांचे नुकसान झाले. शहरांच्या यादीत मुंबईची आघाडी आहे. येथील बँकांत १०५ चोरींच्या घटना घडल्या. त्यात ११ कोटी ४३ लाख रुपयांची रक्कम चोरट्यांनी लंपास केली. त्यापाठोपाठ बंगळुरू येथील बँकांनी २१४ घटनांत २ कोटी ४० लाख रुपये गमावले. तिसऱ्या क्रमांकावरील नाशिक शहरात ३२ घटनांत चोरट्यांनी ३४.१० लाख रुपयांची रक्कम लांबवली. सुरक्षाविषयक विविध उपाययोजना विचारात घेण्यास बँकांची उदासीनता आहे. तसेच बहुतांश घटनांत संबंधित बँकांतील कर्मचारीही चोरट्यांना गुप्त मदत करत असल्याचे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

एकता नगर सार्वजनिक मंडळाचा गणेशोत्सव उत्साहात

मुंबई : एकता नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करताना सामाजिक बांधिलकी जोपासण्याठी स्त्रीभ्रूण हत्येविरोधात जनजागृती करण्यात येत आहे. महापौर सुनील प्रभू यांनी या मंडळाला भेट देऊन गणेशाच्या मूर्तीचे दर्शन घेतले. त्या वेळी महापौरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन आणि कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. कांदिवली महावीर नगर येथील एकता नगर म्हाडा वसाहतीत १९८८ साली सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्यात आला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून रक्तदान शिबीर, विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, वृक्षारोपण आदी कार्यक्रम राबवण्यात येतात. या वर्षी मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जोपासण्याठी स्त्रीभ्रूण हत्येविरोधात फलके लावण्यात आली. २००५ पासून एकता नगर सार्वजनिक मंडळाने लालबागच्या राजाचे दर्शन उपनगरातील गणेशभक्तांना व्हावे, या हेतूने राजाचे मूर्तिकार संतोष कांबळी यांच्याकडून लालबागच्या राजाची प्रतिकृतीची स्थापना करण्यात आली. एकता नगरमधील गणेशाचे दर्शन घेण्यासाठी भविकांची मोठ्या प्रमाणात रांग लागते, अशी माहिती अध्यक्ष हरिश्चंद्र चव्हाण, सचिव संतोष कांबळी आणि सुमित चव्हाण यांनी दिली.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने गिरणगावात पुनर्विकासाचे इमले

नम्रता सावंत-कदम/मुंबई : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम आखले जातात. महाराष्ट्रातील अनेक मोठ कलाकारांच्या कलागुणांना या सांस्कृतिक उपक्रमातच वाव मिळतो, अशी परंपराच या सार्वजनिक गणेशोत्सवात गेले अनेक वर्ष महाराष्ट्रात सुरू केली आहे, मात्र परळच्या धोंडू डोलकर चॅरिटेबल ट्रस्टच्या सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान घरांचा पुनर्विकास त्यातील अडचणी उपाय या विषयावर चर्चासत्र आयोजित करून मुंबईतील सांस्कृतिक वारसा असणाऱ्या गिरणगावातील बदलत्या परिस्थितीला सामोर जात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने नवा पायंडा घालून दिला आहे.

या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून गेले ६ वर्षे गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून दरवर्षी अनोखे उपक्रम राबवण्यात येतात. कल्की शक्तिपीठ गुरू गगनगिरी विश्वस्त संस्था यांचे अध्यक्ष सुधीर अष्टेकर यांनी पुनर्विकासावर चर्चासत्र करण्याची कल्पना आखली आणि दक्षिण मुंबईतील विशेषत:

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा उपक्रम

परळ विभागातील इमारतीचे पुनर्विकासाचे प्रश्न लक्षात घेऊन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे सुनील देवघरकर यांनी सांगितले. गेल्या वर्षीदेखील मुंबईचे बदलते स्वरूप आणि भविष्यातील मुंबई दाखवण्याचा प्रयत्न देखाव्यातून दर्शवण्यात आल्याचे देवघरकर यांनी सांगितले. सार्वजनिाक गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून पुनर्विकासावर चर्चासत्र आयोजित करणारे हे पहिले मंडळ असून, सर्वसामान्यांचा उत्तम प्रतिसाद या चर्चासत्राला मिळत असल्याचे चर्चासत्रातील प्रमुख वक्ते सी. ए. रमेश प्रभू यांनी सांगितले. महाराष्ट्र सोसायटीज वेल्फेअर असोसिएशनतर्फे हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले असून, पुनर्विकासाचे प्रश्न, बॅक गॅरेटी, अभिहस्तांतरण तसेच नामांतर प्रक्रिया, अर्ज कसा भरावा इत्यादी अनेक प्रश्न या चर्चासत्रात विचारण्यात येत असल्याचे प्रभू यांनी सांगितले. गेले सहा दिवस गणेशोत्सवाच्या काळात अनेक पुनर्विकासाबबात जागरूकता निर्माण करण्यात येत असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार मुंबईतील बदल होणे अपरिहार्य झाले आहे. हेच बदल टिपत या मंडळाने केलेला हा उपक्रम स्तुत्य असल्याचे चर्चासत्रातील उपस्थितांकडून सांगण्यात आले आहे. येत्या २८ तारखेपर्यंत हे चर्चासत्र चालणार आहे.

मुंबईत दोन आत्महत्या

मुंबई : गोरेगाव आरे कॉलनीतील एका सेवानिवृत्त इसमाने निवृत्ती वेतन मिळत नसल्याने नैराश्येतून विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली, तर सोमवारी रात्री तिसरा कुंभारवाडा येथे सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेने स्वत:ला जाळून घेतले. आरे दुग्धालय या गोरेगाव (पू.) आरे कॉलनी येथील दूध डेअरीमध्ये काम करणारे शंकर खराडे (६०) हे दोन महिन्यांपूर्वीच सेवानिवृत्त झाले होते. आरे कॉलनी, प्लॉट नंबर ५ येथे राहणाऱ्या खराडेंना तीन मुले असून त्यांच्यापैकी कोणीच कमावते नसल्याने खराडे यांच्या पगारावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत होता.

मात्र निवृत्त झाल्याने त्यांना आता निवृत्ती वेतनाशिवाय पर्याय नव्हता. त्यासाठी खराडे यांनी मुंबईतील कार्यालयात हेलपाटे घालण्यास सुरुवात केली. मात्र त्यांचे निवृत्ती वेतनाला स्वीकृती मिळाली नाही. त्यामुळे नैराश्येच्या गर्तेत पोहोचलेल्या खराडे यांनी आरे कॉलनीतील मोठ्या विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली.

तत्पूर्वी खराडे यांनी सुसाईड नोट लिहिली असून त्यात त्यांनी कार्यालयातील दोन महिला कर्मचाऱ्यांना दोषी ठरवले असल्याचे आरे पोलिसांकडून सांगण्यात आले. अशाच प्रकारे दुसऱ्या एका आत्महत्येच्या घटनेत व्ही. पी. रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या तिसरा कुंभारवाडा, राममंदिर बिल्डिंग नं. २२, दुसरा माळा या ठिकाणी राहणारी किरण हरिओम चौरसिया (२३) या विवाहितेने सासरच्या मंडळींच्या छळाला कंटाळून राहत्या घरात सोमवारी रात्री ११.३० वाजता स्वत:ला जाळून घेऊन आत्महत्या केली. किरणच्या भावाच्या तक्रारीनुसार किरणच्या पतीसह तिच्या सासरच्या मंडळींविरुद्ध हुंडाबळीचा गुन्हा नोंद केला असून अधिक तपास व्ही. पी. रोड पोलीस करीत आहेत.

युवक क्रीडा मंडळाची श्री समर्थ संघावर मात

मुंबई : मुंबई खो खो संघटनेच्या विद्यमाने व ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर आयोजित मुंबई जिल्हा कुमार/ मुली गट खो खो अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेच्या कुमारांमध्ये १२ संघांनी तर मुलींमध्ये ११ संघांनी स्पर्धेत भाग घेतला. ज्येष्ठ संघटक अनंत भाताडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून स्पर्धेस सुरुवात झाली.

पहिल्या दिवशी कुमारांच्या सामन्यात चुरशीची लढत ठरली ती युवक व श्री समर्थ या तुल्यबळ संघांमध्ये. युवकच्या संघाने श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या संघाचा ११-१० असा अवघ्या एका गुणाने पराभव केला. मध्यंतरास दोन्ही संघ बरोबरीत होते. त्यानंतर धारदार आक्रमण करून श्री समर्थने १० गडी मारत सामना जवळपास जिंकलाच होता, मात्र जिगरबाज युवकच्या खेळाडूंनी हार न मानता शेवटच्या २ मिनिटांत ६ गडी मारत विजय मिळवला. युवकतर्फे खेळताना प्रवीण माने याने १.५०, १.१० मिनिटे पळत ४ गडी बाद केले, तर मयूर मर्गज याने २.१०, १.५० मि. संरक्षण करत २ गडी बाद केले तर राजेश खेतले याने १.४०, १.०० मि. पळत ३ गडी बाद केले. श्री समर्थतर्फे खेळताना वरुण पाटील याने २.४०, ३.५० मि. संरक्षण करत ३ गडी बाद केले तर कार्तिक पाटील याने २.४०, १.०० मि. पळत ८ गडी टिपले तर सिद्धिक भगत याने १.३०, १.२० मि. संरक्षण केले व कडवा प्रतिकार केला.

मुलींच्या सामन्यात विजय क्लबच्या संघाने श्री साई समर्थ ॲथलेटिक्स स्पोर्ट्स सेंटरचा १ डाव व ५ गुणांनी पराभव केला. विजय क्लबच्या साक्षी पिळणकर हिने ४.४० नाबाद व ५.५० नाबाद खेळी करत तब्बल ९ गडी बाद केले व एकहाती विजय मिळवून दिला. त्यांचीच श्रद्धा बिडला हिने २.१० मि. पळत २ गडी बाद केले. श्री साईतर्फे दीपाली कळंबकर हिने १.०० मि. पळत ३ गडी बाद केले व चांगली लढत दिली. कुमारांच्या दुसऱ्या सामन्यात विजय क्लब, दादरच्या संघाने शिवनेरी सेवा मंडळ या संघाचा १ डाव व ६ गुणांनी पराभव केला. विजय क्लबतर्फे ऋषिकेश गावडे याने ३.३० मि. नाबाद व ४.०० मि. नाबाद अशी खेळी करत २ गडी बाद केले तर शुभम गुरव याने ३.०० मि. संरक्षण करत ३ गडी मारले. शिवनेरीतर्फे दर्शन भगत याने २.५० मि. संरक्षण करत १ गडी बाद केला व एकाकी लढत दिली.

धारावी सेक्टर-५ चे भूमिपूजन ऑक्टोबरमध्ये अशक्य - बाबूराव माने

नम्रता सावंत-कदम/मुंबई : धारावी सेक्टर-५च्या पुनर्विकासाचा शुभारंभ ऑक्टोबरमध्ये करण्यात यावा, अशी आदेशवजा सूचना मुख्यमंत्र्यांनी म्हाडाला दिली होती. मात्र धारावी पुनर्विकास प्रक्रियेतील परीक्षण अहवाल, विविध निवड प्रक्रिया अजूनही पूर्ण करण्यात आल्या नाही, त्यामुळे ऑक्टोबरमध्ये भूमिपूजन अशक्य असल्याचे मत धारावीतील शिवसेना नेते बाबुराव माने यांनी दै. 'पुण्य नगरी'शी बोलताना स्पष्ट केले.

गेल्या वर्षी मुख्यमंत्र्यांनी धारावी सेक्टर-५ चा पुनर्विकास म्हाडाला करण्याची परवानगी दिली होती. त्यानंतर म्हाडाकडून पुनर्विकास प्रक्रियेच्या निविदा प्रक्रिया वारंवार राबवूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. अंतिमत: बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीला कंत्राट देण्यात आले, मात्र अजूनही प्रकल्प नियोजन सल्लागार कंपनीच्या निविदांना योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सल्लागार कंपनीची निवड करण्यात आलेली नाही. त्यातच अजूनही धारावी सेक्टर-५ मधील झोपड्यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले नसल्याचे माने यांनी सांगितले. ४०० चौ. फूटांचे घर, धारावीत उद्योगनगरी उभारावी, एकात्मिक विकास योजना राबवावी, त्यासाठी शासनाकडून काही धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज माने यांनी या वेळेस बोलून दाखवली.

सत्ताधारी पक्षाकडूनही खाजगी विकासकांना पुनर्विकासाचे गाजर दाखवण्यात येत असून शिवसेनेने मात्र शासनाकडून ४०० चौ. फूटांच्या घराची मागणी केली असल्याचे माने यांनी या वेळेस बोलून दाखवले. पुनर्विकासापूर्वी काही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असून अजून म्हाडाकडून त्या पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे ऑक्टोबरपर्यंत सेक्टर-५ च्या पुनर्विकासाचा शुभारंभ करणे अशक्य असल्याचे माने यांनी स्पष्ट केले.

म्हाडाला धारावी सेक्टर-५ च्या विकासात ६९ हजार कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. या प्रकल्पांतर्गत म्हाडाला ८ हजार कोटी रुपये मिळणार आहेत. पुनर्विकासात सेक्टर-५ चे विभाजन उपविभागांमध्ये करण्यात येणार असून म्हाडाला ४ एफएसआय मिळणार आहे.

मुख्यमंत्र्यांचे लक्ष निवडणुकीकडे

धारावी सेक्टर-५ च्या पुनर्विकासासाठी मुख्यमंत्र्यांकडून करण्यात येणारी घाई निवडणूक डोळ्यासमोर ठेवून घेण्यात आलेला निर्णय असल्याचे माने यांनी दै. 'पुण्य नगरी'शी बोलताना स्पष्ट केले.

वरिष्ठांसाठी राष्ट्रीय मिनीथॉन स्पर्धा

ठाणे : मास्टर्स ॲथलेटिक्स ऑफ महाराष्ट्रतर्फे वरिष्ठ वयोगटांसाठी राष्ट्रीय अजिंक्यपदाच्या अर्धमॅरेथॉन आणि मिनीथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ठाणे शहरात २४ नोव्हेंबर रोजी होईल. विविध १८ वयोगटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. त्यात ३० वर्षांवरील पुरुष (२१ कि. मी), महिला (१० कि. मी), ३५ वर्षांवरील पुरुष (२१ कि. मी), महिला (१० कि. मी.), ४० वर्षांवरील पुरुष (२१ कि. मी), महिला (५ कि. मी), ५० वर्षांवरील पुरुष (१० कि. मी.), महिला (३ कि.मी.), ५५ वर्षांवरील पुरुष (१० कि. मी.), महिला (३ कि. मी.), ६० वर्षांवरील पुरुष (१० कि. मी.), महिला (२ कि. मी.), ६५ वर्षांवरील पुरुष (५ कि. मी.), महिला (२ कि. मी.), आणि ७० वर्षे व ७५ वर्षे वयोगटांच्या पुरुषांसाठी ही स्पर्धा ३ कि. मी. अंतराची असेल. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिसांनी गौरवले जाणार असून, स्पर्धेदरम्यान एक्केरीत साडेपाच लाख रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या परगावातील धावपटूंसाठी मोफत निवास आणि भोजनाची व्यवस्था आयोजकांतफ केली जाणार आहे. स्पर्धेच्या प्रवेशिका १५ नोव्हेंबरपर्यंत स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी आणि प्रवेशिकेसाठी स्पर्धेचे संयोजन सचिव होमियार मिस्त्री यांच्याशी संपर्क साधावा.

डोळ्यांवर पट्टी बांधून मूर्ती साकारणाऱ्या रमा शाह

मेघाली ढोके

कला आणि कौशल्याच्या जोरावर व्यक्तीने आजवर दगडाला आकार दिले आहेत. त्यामुळे कोणतीही कला अवगत असेल तर माणूस काहीही करू शकतो. हे सिद्ध करून दाखवले आहे सायन येथे राहणाऱ्या रमा सतीश शाह यांनी. लहानपणापासूनच संगीत, नृत्य कलेची आवड असणाऱ्या रमा यांनी 'आर्टक्राफ्ट'च्या साहाय्याने वस्तू बनवायला प्रारंभ केला. आर्टक्राफ्टच्या वस्तू त्यांनी लहान मुलांनाही शिकवल्या आहे. कलेमध्ये सुंदरता तर आहे; पण कला आपल्या आत्म्याला सुंदर बनवते, असे त्यांचे मत पूर्वीपासूनचे आहे.

रमा शाह यांचे शिक्षण बीकॉम पर्यंतचे आहे. दोन मुली रिद्धी व वृद्धी, एक मुलगा हर्ष व पती सतीश शाह असा त्यांचा परिवार आहे. उच्च शिक्षणाचा वारसा असूनही त्यांनी आपली कला आजपर्यंत जोपासली आहे.

या क्षेत्रातील त्यांच्या पदार्पणाला रंजक कथा लाभली आहे. मूर्ती बनवणे हा काही त्यांचा पारंपरिक वारसा नव्हता. एके दिवशी म्हणजेच २००० साली रमा यांना स्वप्नात बाप्पांचे दर्शन झाले. तेव्हापासूनच त्यांना मूर्ती बनवायची प्रेरणा मिळाली, असे त्यांनी सांगितले. मूर्ती बनवताना त्या सतत नवकार मंत्र, संकटनाशन स्रोत, ओम गं गणपतेय नम: मंत्रांचे नामस्मरण करून मूर्ती साकारतात. सकाळी ४ वाजल्यापासून त्या मूर्ती बनवायला घेतात. दिवसभरात जवळपास २०० च्या आसपास मूर्ती बनवून होतात. ९९ दिवसांत ९९९९ मूर्ती बनवून वर्ल्ड रेकॉर्डमध्ये २ वेळा नाव नोंदवण्यात आले. तसेच लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये ११ वेळा नाव नोंदले गेले आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालांनीही त्यांचा सन्मान केला आहे. अनेक संस्थेमध्ये त्यांनी कामे केली आहेत. रोटरी क्लब, महिला मंडळ, सीनियर सिटीझन आदी संस्थेमध्ये समाजसेविकेचे काम केले आहे. त्याचबरोबर पोलीस महिला पीस कमिटी, महिला दक्षता कमिटी इ. ठिकाणी ते आपले कार्य करत आहेत. वेगवेगळ्या संस्था,

मंडळे या ठिकाणी त्यांचे अनेक स्टेज शो करण्यात येतात. त्या वेळी लोक रमा शाह यांच्या डोळ्यावर पट्टी बांधून मूर्ती बनवायला सांगतात. तेव्हा त्या केंद्रित होऊन मूर्ती साकारतात. या वेळी तिथे जमलेली मंडळी आश्चर्यचकित होऊन हे पाहत असतात. त्यांच्या भेटीसाठी अनेक लोक वाट पाहत असतात. रमा शाह म्हणाल्या की मी हे काम श्रद्धापूर्वक करत असल्यामुळे मी बनवलेल्या मूर्ती कधीच विकत नाही. या मूर्ती मला भेटायला येणाऱ्यांना मी निर्मळ मनाने भेट म्हणून देत असते. या मूर्तीमुळे अनेकांना चांगले अनुभव आल्याचेही त्या म्हणाल्या. ५ सेमी ते ९ इंचापर्यंत मी मूर्ती साकारते. त्यापेक्षा उंच मूर्ती मी कधीच साकारत नाही. या मूर्तींसाठी लागणारा खर्च मी स्वत: करते किंवा काही वेळा लोक स्वत:च दानपेटीमध्ये पैसे दान करतात. त्यातूनच मूर्तींचे साहित्य मी आणते. उदयपूर, औरंगाबाद, मुंबई, गुजरात इ. ठिकाणांहून बाप्पाचे साहित्य आणले जाते.

गेल्या १२ वर्षांत २ लाख १२ हजार मूर्ती त्यांनी साकारल्या आहेत. या कामात त्यांना त्यांचे पती सतीश शाह यांच्यासोबत कुटुंबीयांचाही पाठिंबा व सहकार्य मिळत गेले. त्यामुळे मी हे सर्व करू शकले, असेही त्या मनापासून सांगतात. कोणत्याही साच्याचा वापर मूर्ती बनवायला केला जात नाही. मुंबईचे प्रसिद्ध गणेश मंदिर म्हणून ओळखले जाणारे सिद्धिविनायक मंदिरामध्ये ही १०८ मूर्ती साकारण्यात आल्या आहेत. अनेक बडे नेते, व्ही.आय.पी, चित्रपटसृष्टीतील हस्ती यांनीदेखील रमा शाह याची कला आपल्या डोळ्यांनी पाहिली आहे. त्यांनादेखील शाह यांनी मूर्ती भेट म्हणून दिल्या आहेत. या मूर्ती घेण्यासाठी अनेक लोक रांगा लावत असतात. माझ्यामध्ये ही कला आहे ती देवाने आशीर्वाद म्हणून दिली आहे. ती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न मी सातत्याने करत आहे. तसेच यापुढेही माझे कार्य मी चालू ठेवेन. मूर्तींच्या स्वरूपात गणपती बाप्पा त्यांच्या भक्तांना आपले दर्शन घडवत आहे. ते कार्य मी करत आहे. त्यामुळे डोळ्यावर पट्टी बांधून न बघता बनवलेल्या या मूर्ती एकही पैसा न घेता यापुढे मी भेट म्हणून देण्याचे कार्य चालूच ठेवणार आहे. यासाठी फक्त सर्वांचा आशीर्वाद, पाठिंबा व सहकार्याची गरज आहे, असेही त्या म्हणाल्या.

मातंग समाज कार्यकर्ता मेळावा उत्साहात

मुंबई : मातंग समाजाला ८ टक्के आरक्षण, मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व इतर मागासवर्गीय विकास महामंडळाचे १ हजार कोटी भागभांडवल वाढवणे, प्रत्येक महामंडळाला ५०० कोटी अनुदान द्यावे, या व इतर १२ मागण्या घेऊन भारतीय मागासवर्गीय महासंघाने मंगळवारी आझाद मैदानात कार्यकर्ता मेळावा आयोजित केला होता.

या वेळी मातंग नेते बाबासाहेब गोपले यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी भारतीय बहुजन आघाडी, भारतीय टायगर सेना, अखिल भारतीय मातंग महासंघ तसेच इतर मातंग संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी बोलताना गोपले म्हणाले, या समाजाकडे सरकारचे लक्ष नाही. ८ टक्के आरक्षण मिळावे म्हणून वेळोवेळी आंदोलने झाली.

क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाला अखिल भारतीय मातंग संघाच्या ५२ शिफारसी लागू करण्यात अद्यापि शासनाला वेळ नाही. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा मंत्रालयासमोर पूर्णाकृती पुतळा शासनाने उभा करावा, या मागणीचाही शासनाला विसर पडला आहे. या व आदी मागण्यांबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा गोपले यांनी दिला.

पी. जे. २८९/१२
दि. २५/९/२०१२

सूचना
बांद्रा येथील कुटुंब न्यायालय क्र. ६ मुंबई मधील याचिका क्र. ए-१९८९ सन २०११

निशाणी क्र. ७

श्री. राजेश रामचंद्र कदम, मुंबई .....याचिकाकर्ते
विरुध्द
सौ. निशा राजेश कदम
राहणार/ ५, गौरीशंकर सी.एच.एस. लि., पेंडसे नगर, व्ही.पी. रोड, डोंबिवली (पू), जि.ठाणे.

सूचना घ्यावी की हिंदू मॅरेज ॲक्ट १९५५ च्या कलम १३(१) (आय ए) अन्वये सोडचिठ्ठी करिता याचिका याचिकाकर्त्यांनी दाखल केली आहे. याचिका ६ वे कुटुंब न्यायालय मुंबई किंवा न्यायालयाचा प्रभार असलेल्या कोणत्याही कुटुंब न्यायालयासमक्ष **२९ ऑक्टोबर, २०१२ रोजी स.११.०० वा. (ठिक)** सुनावणी आणि अंतिम निकालाकरिता निश्चित करण्यात आली आहे, जेव्हा तुम्ही व्यक्तीश: हजर राहणे आणि तुमचे लेखी विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे आणि असे करण्यात तुम्ही कसूरवार ठरल्यास, सन्माननीय कुटुंब न्यायालय हे तुमच्या अनुपस्थितीत तुमच्या विरोधात सदर अर्जाच्या सुनावणीची कार्यवाही करतील आणि त्यावर निर्णय घेतील.

सदर सूचना १० सप्टेंबर २०१२ रोजी श्री. एस.ए.मोरे न्यायाधीश, कोर्ट क्र.६ द्वारे देण्यात आली आहे.
माझ्या हस्ते आणि सदर न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
सदर दिनांक १० सप्टेंबर २०१२

कोर्टाचा शिक्का

सही/-
उप रजिस्ट्रार,
बांद्रा येथील कुटुंब न्यायालय मुंबई,
बांद्रा - ०५१ येथे

महाराष्ट्र राज्य लॉटरी **पद्मीनी** सोडत दर मंगळवारी
सोडत क्रमांक 39
सोडत दिनांक 25/09/2012

लॉटरी भंडार नागपूर — **लॉटरी भंडार** लाल इमली गली, इतवारी, नागपूर 440 002. फोन. 0712-2761195 फॅक्स. 0712-2763047.

मालिका	PM-1239 A	PM-1239 B	PM-1239 C	PM-1239 D	PM-1239 E
पहिले सामाईक बक्षिस रु. 5 लाख	—	—	—	25651	—
दुसरे बक्षिस रु. 10 हजार	14353	24229	21676	23722	28295
तिसरे बक्षिस रु. 5000/-	27168	28283	21293	11698	18507
चौथे बक्षिस रु. 2000/-	0584	9499	8234	7678	8356
पाचवे बक्षिस रु. 1000/-	5168	1892	7790	6362	8854

सर्व मालिकांसाठी — COMMON TO ALL SERIES — सर्व मालिकांसाठी

सहावे बक्षिस रु. 500/-	1558	2348	2917	4064	5692	5966	6820	7029	7093	8865
सातवे बक्षिस रु. 200/-	0158	2642	4022	4760	5359	5473	7275	7663	8805	9712
आठवे बक्षिस रु. 100/-	0424	1349	3763	3913	6309	7598	8229	9255	9422	9850
नववे बक्षिस रु. 40/-	9754	या क्रमांकास तसेच या क्रमांकाच्या मागील तसेच पुढील प्रत्येक 10 व्या क्रमांकाच्या तिकीटास (सर्व मालिकांसाठी) नववे बक्षिस रु. 40/- देण्य